**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**

**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

| | |
|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d81@yahoomail.com |


**आरोग्य सेवा**

जा.क्र.आमाजिआ/कक्ष८१/10684-10726/१७

दिनांक 29/6/२०१७

परिपत्रक

महत्वाचे

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
जिल्हा निबंधक जन्म मृत्यू
जिल्हा परिषद.... सर्व

विषय : नागरी नोंदणी योजना
जन्म व मृत्यू अहवालातील सांख्यिकी भागाबाबत...

संदर्भ :१.या कार्यालयाचे परिपत्रक क्र. आमाजीआ/कक्ष ८१/सांख्यिकी अहवाल/ ९३४६-९६९९/१५ दि.२१.१०.२०१५

२.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.आमाजीआ/कक्ष-८१/नानोप/२२६६-२५३९/१६ दि.१४.०३.२०१६

उपरोक्त विषयातर्गत या कार्यालयाची वरिल संदर्भिय परिपत्रकांचे अवलोकन करावे. वरिल नमूद परिपत्रकात प्रामुख्याने पंचायत समिती स्तरावर जन्म मृत्यू अहवालीतील जतन करुन ठेवलेले सांख्यिकी भागाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेले होते. याबाबत पुढील मार्गदर्शक सूचनेनुसार सांख्यिकी भागाबाबत कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

१. सन २०१५ पूर्वीचे जन्म मृत्यू अहवालाचे सांख्यिकी भाग पंचायत समिती स्तरावर जतन करुन ठेवण्यात आलेले होते. उपसंचालक आमाजीआ तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू स्तरावरुन सन २०१५ या वार्षिक अहवालाला AVSR अंतिम स्वरुप देण्यात आल्याने पंचायत समिती स्तरावर २०१५ पर्यंतचे सांख्यिकी अहवाल Hard Copy जतन करुन ठेवण्याची आवश्यकता नाही.

सन २०१६ पासून केंद्र सरकारच्या जन्म मृत्यू संगणक प्रणाली crsorgi.gov.in मध्ये जन्म मृत्यूची माहिती भरणे शासनाने बंधणकारक केलेले असल्याने यापुढे कोणत्याही ग्रामसेवक तथा निबंधक जन्म मृत्यू यांनी सांख्यिकी भाग पंचायत समिती स्तरावर देण्याची आवश्यकता राहिलेली नाही. प्रत्येक ग्रामसेवकांनी जन्म मृत्यू घटनांची माहिती संगणक प्रणालीत भरल्यानंतर सदर

सांख्यिकी भागाची माहिती जतन करुन ठेवण्याची आवश्यकता नाही.

सर्व ग्रामसेवकांनी दर महिन्यास त्याच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या जन्म मृत्यू घटनांची आकडेवारी नमुना क्र.११,१२ व १३ मधे संबंधित पंचायत समिती यांना देणे बंधनकारक असून सर्व पंचायत समितीनी त्याच्या कार्यक्षेत्रातील एकूण घटनांची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दि.५ तारखेपुर्वी घ्यावयाची आहे यांची नोंद घ्यावी.

२. नगरपालिका व महानगर पालिका हया संस्था कडून सन २०१५ पूर्वी सांख्यिकी भाग पुणे कार्यालयास सादर करण्यात येत होता. सन २०१६ पासून सदर सांख्यिकी माहिती संगणक प्रणाली मार्फत पुणे कार्यालयास उपलब्ध होत असल्याने ही माहिती यापुढे पुणे कार्यालयास पाठविण्यात येऊ नये याबाबत संदर्भिय पत्र क्र.२ नुसार कळविण्यात आलेले आहे त्याची अमलबंजावणी करण्यात यावी.

आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व नगर पालिका, पंचायत समिती, महानगरपालिका यांना लेखी सूचना देण्यात याव्यात व याबाबत उपसंचालक आ.मा.जी.आ. कार्यालयास अवगत करावे.

उपसंचालक आरोग्य सेवा तथा
उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी (जिल्हा आरोग्य अधिकारी मार्फत)
१.गट विकास अधिकारी....सर्व
२.महानगर पालिका.....सर्व
३.नगरपालिका व नगर परिषद....सर्व

प्रत माहितीसाठी सस्नेह:
उपसंचालक आरोग्य सेवा
....मंडळ.....सर्व

प्रत माहितीसाठी सविनय सादर:
मा. संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म मृत्यू, मुंबई-१

महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
ना.नों. विभाग ☎ :- ०२० - २६०५८२९२
फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल dydhs.sbhivs@gmail.com


आरोग्य सेवा

जा.क्र.आमाजिआ/कक्ष ८१/सांख्यिकी अहवाल/9346-9697/१५

दिनांक:- २१/१०/२०१५

प्रति,
गट विकास अधिकारी,
तथा अप्पर जिल्हा निबंधक,
जन्म मृत्यु, पंचायत समिती............(सर्व)
(जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद मार्फत)

**विषय :- सन २०१२ पर्यंतच्या सांख्यिकी भागाच्या रेकॉर्ड बाबत...**

पंचायत समिती स्तरावर ग्रामसेवकांकडून प्राप्त सांख्यिकी भागाचे रेकॉर्ड जतन करुन ठेवलेले आहे. सदर रेकॉर्ड हे उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), कार्यालयाने जन्म मृत्यु कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल (Annual Vital Statistics Report) प्रसिध्द झाल्यावर जतन करुन ठेवण्याची आवश्यकता नाही, असे सुचित केलेले आहे.

उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे कार्यालयाने सन २०१२ चा वार्षिक अहवाल प्रसिध्द केलेला असल्याने डिसेंबर २०१२ पर्यंतचे सर्व सांख्यिकी भागाची कागदी प्रत (Hard Copy) जतन करुन ठेवण्याची आवश्यकता नाही.

सन २०१२ नंतरच्या सांख्यिकी अहवालाबाबत स्वतंत्र पत्र काढण्यात येईल.

**उपसंचालक आरोग्यसेवा (आमाजीआ) तथा**
**उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत माहितीसाठी सादर,
मा. संचालक, आरोग्य सेवा, तथा मुख्य निबंधक, जन्म मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**
**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

डॉ.तानाजी माने
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल dydhs.sbhivs@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.आमाजिआ/कक्ष८१/ नानोंप/ 2266-2539/१६

दिनांक:-१४ /०३/२०१६

प्रति,
कार्यकारी आरोग्य अधिकारी
तथा निबंधक जन्म-मृत्यू,
बृन्हमुंबई महानगरपालिका, (1)
**मुंबई.**
आरोग्य अधिकारी तथा निबंधक,
**जन्म-मृत्यू, महानगरपालिका...(सर्व)** (25)
**(जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.यांच्या मार्फत)**
मुख्याधिकारी तथा
निबंधक, जन्म-मृत्यू,
नगरपालिका........(सर्व) (235)
**(जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.यांच्या मार्फत)**
कार्यकारी अधिकारी तथा निबंधक,जन्म-मृत्यू,
कॅन्टॉन्मेंट बोर्ड....(सर्व) (7)
**(जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.यांच्या मार्फत)**
प्रशासक ॲम्युनिशन फॅक्टरी तथा निबंधक,जन्म-मृत्यू....(सर्व)
**(जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.यांच्या मार्फत)** (4)

विषय : नागरी नोंदणी योजनेअंतर्गत जन्म-मृत्यू अहवालातील सांख्यिकी भागाचे उपसंचालक स्तराव सादरीकरणाबाबत.

उपरोक्त विषयास अनूसरुन, नागरी नोंदणी योजनेअंतर्गत शहरी भागातील प्रामुख्याने नगरपालिका, महानगरपालिका, कॅन्टोंमेंट बोर्डस इ. नोंदणी संस्थांकडून जन्म-मृत्यू घटनांची नोंदणी झाल्यानंतर सांख्यिकी भाग हा डेटा एन्ट्रीं करण्यासाठी उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयास सादर करण्यात येत आहेत.

केंद्र शासनाने दि. ०१ जानेवारी २०१६ पासून नागरी नोंदणी योजने अंतर्गत नविन संगणक प्रणाली संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सर्व शहरी भागात कार्यान्वित करण्यात केलेली आहे.

सदर सांख्यिकी अहवालांची आता या पुढे डेटा एन्ट्रीं या कार्यालयात करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. शहरी भागातील सर्व संस्थांना सूचित करण्यात येते कि, नवीन संगणक प्रणाली मधून कायदेविषयक तसेच <u>सांख्यिकी भागाची माहिती संबंधित निबंधकास भरावी लागणार आहे त्यामुळे सांख्यिकी भागाचे अहवाल उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयास पाठविणे बंद करावेत.</u>

रुग्णालयीन मृत्यूची नोंद होत असताना नमूना क्र.४ मध्ये मृत्यूचे कारण वैद्यकीय दृष्टया प्रमाणित करुन या कार्यालयास सादर करण्यात येत आहे त्याचप्रमाणे घरी झालेला मृत्यू बाबत मृताचे कारण वैद्यकीय अधिकारी यांना माहित असल्यास त्याबाबत नमूना क्र.४अ सादर करण्यात येत आहे वरील नमूद नमूना क्र.४आणि ४अ (मृत्यूच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणिकरण बाबतचा अहवाल) या कार्यालयास यापूढे सुध्दा सादर करावयाचा आहे याची सर्वानी नोंद घ्यावी.(वरील नमूना क्र.४व४अ यामध्ये मृत्यूचे कारण नमूद केलेले असल्याने त्याची गोपनीयता बाळगण्याबाबतच्या केंद्र शासनाच्या सूचने नूसार नमूद अहवाल मृत व्यक्तीच्या नातेवाईकांकडे कोणत्याही परिस्थितीत देवू नये याची नोंद घ्यावी.)

सदर पत्र संबंधित सर्व संस्थांना तातडीने ईमेल व्दारे पाठविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपसंचालक आरोग्य सेवा तथा
उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू
महाराष्ट्र राज्य पुणे.

<u>**प्रत माहितीस्तव सविनय सादरः**</u>
मा. संचालक,आरोग्य सेवा तथा मुख्यनिबंधक, जन्म-मृत्यू,आरोग्य सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई.

# मासिक अहवाल

(१) अहवाल माहे .................................................... **वर्ष** ....................................

(२) जिल्हा ....................................................

(३) शहर/गाव ....................................................

(४) नोंदणी केंद्र ....................................................

(५) जनगणना कोड नंबर ....................................................

---

**नमुना क्रमांक ११**

**जन्माचा संकलित अहवाल**

(१) महिन्यात नोंदविण्यात आलेले जिवंत जन्म –

| | पुरूष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| (अ) घटनेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत नोंदविलेले : | | | |
| (ब) घटनेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या नंतर नोंदविलेले : | | | |
| *एकूण (अ + ब) | | | |

---

**नमुना क्रमांक १२**

**मृत्युचा संकलित अहवाल**

(१) महिन्यात नोंदविण्यात आलेल्या मृत्युचे विवरण :

| मृत्यु | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घटनेच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत नोंदविलेले (१) | | | घटनेच्या दिनांकापासून १ वर्षाच्या नंतर नोंदविलेले (२) | | | एकूण* (३) | | | अर्भक मृत्यु (एकूण मृत्यूपैकी) (४) | | | माता मृत्यु (५) |
| स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | |
| | | | | | | | | | | | | |

टीप : अर्भकमृत्यु व मातामृत्यु हे एकूण मृत्युमध्ये समाविष्ट असावेत.

---

**नमुना क्रमांक १३**

**मृत जन्म (उपजत मृत्यु) चा संकलित अहवाल**

(१) नोंदविण्यात आलेले मृत जन्म (उपजत मृत्यु) ____________________

---

* एकूण जिवंत जन्मांची संख्या/मृत्युंची संख्या/मृत जन्म (उपजत मृत्यु) संख्या ही अहवालासोबत प्राप्त झालेल्या अनुक्रमे नमुना क्र. १/२/३ अहवालाच्या संख्येइतकी असावी.

दिनांक :

**निबंधकाचे नाव/सही**

**शिक्का**

सादर,

उपमुख्य निबंधक/जिल्हा निबंधक/गटविकास अधिकारी, पं.स. .............,